-: प्रेसनोट दिनांक - २१/१०/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक निवास श्रीपती पाटील, वय- ४५ वर्षे, पद - राज्यकर अधिकारी, वर्ग -२, वस्तु व सेवा कर कार्यालय (राज्य) कोल्हापूर रा.ए - ६०५, रॉयल ऑस्टोनिया, न्यु पॅलेस मागे गेटजवळ, नागळा पार्क, कोल्हापूर, मुळ, रा. कोलोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांची ऑईल आणि ग्रीस रिपॅकींग करण्याची कंपनी आहे. जुन २०२४ मध्ये तक्रारदार यांचे वडील यांना त्यांचे कंपनीबाबत जी.एस.टी.विभाग कोल्हापूर येथुन निवास पाटील यांनी आमचे कंपनीमध्ये सन २०२० -२०२१ मध्ये जी.एस.टी.विभागाचे नियमाप्रमाणे कागदपत्रे तसेच रजिस्टर आहेत अगर कसे याबाबत नोटीस पाठविली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी वेळोवेळी कागदपत्रांची पुर्तता केलेली होती. तक्रारदार व त्यांचे वडील जी.एस.टी.ऑफीस कोल्हापूर येथे जावुन पाटील यांना भेटले त्यावेळी पाटील यांनी कंपनीचा बॅक अंकाऊंट नंबर जी.एस.टी.पोर्टल ला अपडेट केलेला नाही तसेच बॅलन्स शिट मधील क्रेडीटर्स डिटेल्स पुर्ण दिले नाहीत या दोन गोष्टीसाठी तुम्हाला जी.एस.टी. च्या नियमाप्रमाणे अंदाजे दिड ते दोन लाख रूपये दंड व त्यावरील व्याज असे मिळुन अदाजे दोन ते अडीच लाख रूपये दंडाची नोटीस काढणार असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना कागदपत्राची पुर्तता करतो असे म्हणाले असता निवास पाटील यांनी तक्रारदार व त्यांचे वडीलांना तुम्हाला दोन लाख रूपये दंडाची नोटीस नको असेल तर तुम्ही मला २५,०००/- रूपये दयावे लागतील, तुम्ही जर २५,०००/- रूपये दिले तर मी तुम्हाला दंडाची नोटीस काढणार नाही. हा विषय मी बंद करून टाकतो असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे २५,०००/-रू.दयावे अशी लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आलोसे निवास पाटील राज्यकर अधिकारी **वस्तु व सेवा कर कार्यालय (राज्य) कोल्हापूर** यांनी तक्रारदार यांना त्यांचे कंपनीचा बॅक अंकाऊंट नंबर जी.एस.टी.पोर्टल ला अपडेट केलेला नाही तसेच बॅलेन्स शिट मधील क्रेडीटर्स डिटेल्स पुर्ण दिले नाहीत म्हणुन दंडाची नोटीस काढणार नाही. तसेच जी.एस.टी.विभागाकडुन कोणताही कारवाई करणार नाही असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक निवास श्रीपती पाटील, वय- ४५ वर्षे, पद - राज्यकर अधिकारी, वर्ग -२,वस्तु व सेवा कर कार्यालय (राज्य) कोल्हापूर रा.ए - ६०५, रॉयल ऑस्टोनिया, न्यु पॅलेस मागे गेटजवळ, नागळा पार्क, कोल्हापूर, मुळ, रा. कोलोली, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी स्वत:साठी मागणी केलेप्रमाणे २५,०००/- रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन, सदर आलोसे यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. अजय चव्हाण, पो.हे.कॉ.विकास माने, पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर, पो.ना.सुधिर पाटील, पो.ना.सचिन पाटील, पोकॉ कृष्णा पाटील, चा.स.फौ. गजानन कुराडे, पो.कॉ.प्रशांत दावणे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) **मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
२) **मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
३) **वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
४) **हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
५) **व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

**( वैष्णवी पाटील )**
**पोलीस उप अधीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर**